मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: 9834138482



# पिंपरी-चिंचवडच्या विकासाला स्थायी समितीची गती!

## पाणीपुरवठा, रस्ते, आरोग्य, स्वच्छता अन् युवकांच्या कौशल्य प्रशिक्षणासह विकासकामांना मंजुरी



» पिंपरी | प्रतिनिधी

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा आज स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. शहराचा विकास केवळ नवीन प्रकल्पांपुरता मर्यादित नसून नागरिकांना मिळणाऱ्या मूलभूत सेवा दर्जेदार, सुरक्षित आणि अखंडित ठेवणे आवश्यक आहे, या भूमिकेतून या सभेत पाणीपुरवठा व्यवस्थेची गुणवत्ता, रस्ते व बीआरटीएस मार्गांची दुरुस्ती, आरोग्य सुविधा, स्वच्छता सेवा तसेच युवकांसाठी आंतरराष्ट्रीय भाषा प्रशिक्षणासारख्या विविध महत्त्वाच्या विषयांना सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

सभेच्या प्रारंभी शहर अभियंता पदी नियुक्ती झाल्याबद्दल मनोज सेठीया यांचा स्थायी समितीच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. त्यानंतर शहराच्या सर्वांगीण विकासाशी निगडित विविध विषयांवर सविस्तर चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले. शहरातील नागरिकांना शुद्ध आणि सुरक्षित पाणीपुरवठा करण्याच्या दृष्टीने निगडी सेक्टर २३ आणि चिखली टप्पा क्रमांक १ येथील जलशुद्धीकरण केंद्रांसाठी आवश्यक पावडर पॉली इलेक्ट्रोलाईट (CATIONIC) रसायन खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच याच जलशुद्धीकरण केंद्रांतील निर्जंतुकीकरण प्रक्रियेसाठी स्टेबल ब्लिचिंग पावडर (TCL) उपलब्ध करून घेण्यासही मंजुरी देण्यात आली, ज्यामुळे जलशुद्धीकरणाची प्रक्रिया तांत्रिक निकषांनुसार सुरळीत पार पडण्यास मदत होईल. याशिवाय, पाणीपुरवठा वितरण व्यवस्था अधिक सक्षम ठेवण्यासाठी अजमेरा, मोरवाडी व मासुळकर कॉलनी परिसरातील पाणी वितरण व्यवस्थेचे परिचालन करण्याच्या कामास मंजुरी देण्यात आली. दापोडी, जुनी सांगवी आणि नवी सांगवी भागातील पाण्याच्या टाक्यांची शास्त्रीय पद्धतीने साफसफाई करणे तसेच कृष्णानगर येथील एम-१ आणि एस-२ पंप हाऊस व पाण्याच्या टाक्यांच्या परिसरातील देखभाल, दुरुस्ती आणि परिचालनाची कामे हाती घेण्यासही मान्यता देण्यात आली. महापालिकेच्या औद्योगिक प्रशिक्षण विभागांतर्गत मोरवाडी व कासारवाडी येथे विद्यार्थ्यांसाठी जपानी आणि जर्मन भाषा अभ्यासक्रम सुरू करण्याचा एक अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. एक वर्षाच्या या अभ्यासक्रमामुळे विद्यार्थ्यांना केवळ दर्जेदार भाषा प्रशिक्षणच मिळणार नाही, तर आंतरराष्ट्रीय भाषा परीक्षांचे मार्गदर्शन, तांत्रिक सहकार्य, आवश्यक पुस्तके, अभ्यास साहित्य, अधिकृत प्रमाणपत्र आणि भारतात किंवा परदेशात रोजगारासाठी प्लेसमेंट सपोर्ट उपलब्ध करून दिला जाणार आहे. तसेच विद्यार्थ्यांना स्वयंरोजगार, स्टार्टअप, शासकीय योजना आणि सार्वजनिक क्षेत्रातील संधींबाबतही मार्गदर्शन केले जाणार असल्याने युवकांच्या जागतिक रोजगाराच्या संधींना मोठी चालना मिळणार आहे. शहरातील उद्यानांची नियमित देखभाल अखंडित राहावी यासाठी सध्या सुरू असलेल्या उद्यान देखभाल कामांना नवीन निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. त्याचबरोबर महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये कार्यालयातील सुविधा अधिक कार्यक्षम व सुस्थितीत ठेवण्यासाठी आवश्यकतेनुसार नूतनीकरण, देखभाल-दुरुस्ती आणि फर्निचरविषयक कामे करण्यास मान्यता देण्यात आली. सार्वजनिक वाहतूक आणि दळणवळण अधिक सुरळीत करण्यासाठी रस्ते व बीआरटीएस मार्गांच्या दुरुस्तीचे अनेक प्रस्ताव मंजूर करण्यात आले. नाशिक फाटा ते वाकड बीआरटीएस रस्त्यावरील आवश्यक दुरुस्ती, पुणे-आळंदी बीआरटीएस कॉरिडॉरवरील डेडिकेटेड लेन व बसथांब्यांची दुरुस्ती, भक्ती-शक्ती चौक ते गोडाऊन चौक या रस्त्याचे पॅचवर्क पद्धतीने डांबरीकरण आणि पुणे-आळंदी रस्त्यावरील पॅचवर्क डांबरीकरण करण्यास मंजुरी देण्यात आली. या कामांमुळे वाहनचालकांना अधिक सुरक्षित आणि खडतररहित रस्ते उपलब्ध होणार आहेत. तसेच, 'ब' क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील रस्ते आणि गटर्सच्या नियमित साफसफाईचे काम नवीन निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत अखंडित सुरू ठेवण्यासाठी आवश्यक मुदतवाढ देण्यात आली आहे. पिंपरी महापालिकेसाठी आकुर्डी येथे कार्यरत असलेल्या न्यायादंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालयातील न्यायाधीश, अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्त्यांच्या आस्थापना खर्चाची शासन निर्णयानुसार प्रतिपूर्ती करण्यासही सभेत मान्यता देण्यात आली. आरोग्य क्षेत्राला अधिक बळकटी देण्यासाठी वायसीएम रुग्णालय आणि नवीन थेरगाव रुग्णालयातील पीपीपी तत्त्वावर कार्यरत एमआरआय केंद्रांमार्फत पात्र रुग्णांच्या करण्यात आलेल्या मोफत व सवलतीच्या एमआरआय तपासण्यांच्या बिलांची अदायगी करण्यास मंजुरी देण्यात आली असून, पुढील काळातही अशा तपासण्यांच्या खर्चाची अदायगी नियमितपणे केली जाणार आहे. यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील वॉर्डांमधून निर्माण होणाऱ्या जैववैद्यकीय कचऱ्याची सुरक्षित विल्हेवाट लावण्यासाठी NON-CHLORINATED लाल व पिवळ्या पिशव्या उपलब्ध करून घेण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच, वैद्यकीय विभागांतर्गत विविध राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक वाहने दोन वर्षांच्या कालावधीसाठी भाडेतत्त्वावर घेण्यास मान्यता देण्यात आली. याशिवाय, जगद्गुरू संत तुकाराम महाराज आणि संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा २०२६ च्या अनुषंगाने आरोग्य विभागासाठी करण्यात आलेल्या टोप्या व बॅच छपाईच्या खर्चाचे सभेत अवलोकन करण्यात आले.

> “शुद्ध पाणीपुरवठा, सक्षम रस्ते, सार्वजनिक वाहतूक, दर्जेदार आरोग्य सेवा आणि स्वच्छता यांना प्राधान्य देतानाच आपल्या युवकांना जागतिक रोजगाराच्या संधींसाठी तयार करणे आवश्यक आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम आणि ‘हर घर तिरंगा’सारख्या उपक्रमांच्या माध्यमातून शहराच्या सामाजिक आणि सांस्कृतिक सहभागाला चालना देण्याचा आमचा प्रयत्न आहे. नागरिकहित, गुणवत्ता आणि कार्यक्षम प्रशासन यांना केंद्रस्थानी ठेवून पिंपरी-चिंचवडच्या सर्वांगीण विकासासाठी स्थायी समिती नेहमीच कटिबद्ध राहील..”
>
> -अभिषेक बारणे, **सभापती - स्थायी समिती, पिंपरी चिंचवड महापालिका.**

### क्रीडा, सांस्कृतिक उपक्रमांना महापालिकेची मंजुरी

क्रीडा आणि सांस्कृतिक उपक्रमांना प्रोत्साहन देताना, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आणि महाराष्ट्र हॉकी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडियम येथे आयोजित १६ व्या ज्युनिअर महिला नॅशनल हॉकी स्पर्धेसाठीच्या पायाभूत सुविधांच्या खर्चास मंजुरी देण्यात आली. तसेच 'फ' क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती व विचार प्रबोधन पर्व निमित्त आयोजित कार्यक्रमाच्या ध्वनीक्षेपन आदी विद्युतविषयक खर्चास आणि केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार शहरात राबविण्यात आलेल्या ‘हर घर तिरंगा’ अभियानाच्या खर्चासही मान्यता प्रदान करण्यात आली.

# विद्यार्थ्यांनी घेतले अग्निसुरक्षेचे धडे; अग्निशमन दलाकडून प्रात्यक्षिक

## अग्निशमन जवानांकडून बचाव साहित्याचे प्रात्यक्षिक; विद्यार्थ्यांना सुरक्षिततेचे धडे

**पिंपरी | प्रतिनिधी**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागामार्फत शालेय विद्यार्थ्यांमध्ये अग्निसुरक्षा आणि आपत्ती व्यवस्थापनाबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी विशेष अग्निसुरक्षा जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत रायका स्कूल, पिंपळे सौदागर येथील विद्यार्थ्यांसाठी पिंपरी मुख्य अग्निशमन केंद्र येथे अग्निसुरक्षा जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.**





उप आयुक्त व्यंकटेश दुर्वास यांच्या मार्गदर्शनाखाली चालू असलेल्या या अभियाना अंतर्गत लीडिंग फायरमन नामदेव वाघे यांनी विद्यार्थ्यांना अग्निशमन विभागाच्या कार्यपद्धतीची तसेच आपत्कालीन परिस्थितीत अग्निशमन व बचाव पथकांकडून करण्यात येणाऱ्या कार्यवाहीची माहिती दिली. तसेच आपदा मित्र संतोष शेलार, अफसाना पठाण, गीतेश बांगरे यांनी विद्यार्थ्यांना अग्निशमन वाहनांची पाहणी करून त्यामध्ये असलेली विविध उपकरणे, अग्निशमन साहित्य आणि बचाव साधनांची माहिती व प्रात्यक्षिक दिले.

यावेळी आग लागल्यास घाबरून न जाता प्रसंगावधान राखणे, सुरक्षित ठिकाणी जाणे, धुरापासून स्वतःचा बचाव करणे आणि आपत्कालीन परिस्थितीत योग्य पद्धतीने प्रतिसाद देणे याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. आग लागल्यास तात्काळ अग्निशमन विभागाच्या १०१ या आपत्कालीन क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी अग्निशमन केंद्राची पाहणी करत जवानांशी संवाद साधला आणि अग्निशमन वाहने, उपकरणे व बचाव साहित्याविषयी उत्सुकतेने माहिती जाणून घेतली. प्रत्यक्ष पाहणी आणि संवादाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अग्निशमन विभागाचे कार्य जवळून समजून घेण्याची संधी मिळाली.

लहान वयातच अग्निसुरक्षेबाबत योग्य माहिती आणि सुरक्षिततेच्या उपाययोजनांची जाणीव निर्माण झाल्यास आपत्कालीन परिस्थितीत विद्यार्थी अधिक सजगपणे व जबाबदारीने वागू शकतात. या उद्देशाने महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागामार्फत शाळांमध्ये अग्निसुरक्षा जनजागृतीचे विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये अग्निसुरक्षा, आपत्ती व्यवस्थापन आणि आपत्कालीन परिस्थितीत योग्य प्रतिसाद देण्याबाबत जागरूकता निर्माण झाली. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत अग्निसुरक्षेचे महत्त्व जाणून घेतले.

# हिंजवडीत २ किमीचा प्रवास दीड तासांत! आयटीयन्सचा संताप

**पिंपरी | प्रतिनिधी**

**हिंजवडी आयटी पार्कमध्ये सकाळी आणि सायंकाळी गर्दीच्या वेळी फेज १ ते फेज ३ या अवघ्या दीड ते दोन किलोमीटर रस्त्याच्या अंतरासाठी तब्बल दीड तासाचा अवधी लागतो. प्रचंड वाहतुक कोंडी आणि रस्त्यावरील खड्डे यामुळे या रस्त्यावरील रूग्णालयात एखाद्या रूग्णाला न्यायचे असल्यास रूग्णालयापर्यंत रूग्ण पोहोचू शकणार नाही, अशी दयनीय अवस्था असल्याची व्यथा परिसरातील आयटीएन्स आणि सोसायटीधारकांनी शिवसेना (ठाकरे) पक्षाचे आमदार आदित्य ठाकरे यांच्यासमोर मांडली.**



तसेच, आमच्या विविध मागण्यांसाठी ६ सप्टेंबर रोजी तीव्र आंदोलन करणार असल्याची आयटीएन्सनी घोषणा केली. आदित्य ठाकरे यांनीही त्यांच्या आंदोलनाला जाहीर पाठींबा दर्शविला. चाकण औद्योगिक परिसरातील सुमारे २० कंपन्यांनी खराब रस्ते, प्रचंड वाहतूक कोंडी आणि इतर पायाभुत सुविधांच्या अभावामुळे इतर ठिकाणी स्थलांतर करण्याचा निर्णय घेतल्याच्या पार्श्वभुमीवर आमदार आदित्य ठाकरे

यांनी स्वातंत्र्यदिनी चाकण एमआयडीसीतील रस्त्यांची पाहणी करून स्थानिक नागरिकांशी संवाद साधला होता. त्यानंतर त्यांना हिंजवडी आयटी पार्कमधील आयटीयन्सनी मॅसेज करून हिंजवडीतील विविध समस्यांबाबत आपण येथेही पाहणी दौरा करावा, अशी विनंती केली होती.

त्यानुसार आमदार आदित्य ठाकरे यांनी मंगळवारी हिंजवडीतील रस्त्यांची पाहणी केली. स्थानिक नागरिकांशी संवाद साधत आदित्य ठाकरे यांनी त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. हिंजवडीतील मेट्रो स्टेशनचीही त्यांनी पाहणी करीत कामाचा आढावा घेतला. हिंजवडी ग्रामपंचायत कार्यालयाला भेट देत ग्रामपंचायत सदस्यांशीही त्यांनी परिसरात भेडसावणाऱ्या प्रश्नांबाबत चर्चा केली.

आयटीएन्स, सोसायटीधारक यांच्यासोबत त्यांनी बैठक घेतली. बैठकीत नागरिकांनी आदित्य ठाकरे यांच्यासमोर आपल्या व्यथा मांडल्या. हिंजवडी परिसरातील आयटी कंपन्यांमध्ये सुमारे चार ते पाच लाख कर्मचारी कार्यरत आहेत. त्यांना रस्ते, पाणी, वीज या मुलभुत सुविधा प्राधान्याने मिळणे गरजेचे आहे. मात्र, येथील रस्त्यांची दयनिय अवस्था आहे. त्यातच गर्दीच्या वेळी सकाळी आणि सायंकाळी प्रचंड




वाहतुक कोंडी असते. दोन-दोन तास आम्हाला वाहतुक कोंडीत अडकून पडावे लागते. रस्त्यावरील अतिक्रमणांमुळे फुटपाथ कुठेच दिसत नाहीत. त्यामुळे रस्त्याने चालत जाताना जीव मुठीत धरूनच ये-जा करावी लागते, अशी व्यथा एका सोसायटीधारकाने मांडली. मागील वर्षभरात या परिसरात रस्ते अपघातात १० जणांना आपला जीव गमवावा लागला आहे, याकडेही त्यांनी लक्ष वेधले.

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पाहणी दौरे करून परिसर अतिक्रमण मुक्त करण्यासाठी पाऊल उचलले होते. मात्र, आता पुन्हा अतिक्रमणे होऊ लागली आहेत. सोसायट्यांमधील कचऱ्याचा प्रश्नही गंभीर आहे. कचरा वेळेवर उचलला जात नाही. त्याचे विलगीकरण केले जात नाही. ग्रामपंचायतीची यंत्रणा अपुरी पडते. मुळशी धरणातून पाणी आणण्याचा विषय गेल्या कित्येक वर्षांपासून चर्चेत आहे. मात्र, निर्णय काहीच होत नाही, अशी व्यथाही नागरिकांनी आदित्य ठाकरे यांच्यासमोर मांडली.

### आंदोलनासाठी परवानगीची गरज नसते

प्रशासनाच्या कारभाराविरोधात आम्हाला आंदोलन करायचे आहे. मात्र, पोलीसांकडे आंदोलनासाठी परवानगी मागितल्यास नकार दिला जातो, असे बैठकीत काही आयटीएन्सनी आदित्य ठाकरे यांना सांगितले. त्यावर आदित्य ठाकरे यांनी आंदोलनासाठी कधीच परवानगी मिळत नाही. त्यासाठी रस्त्यावर उतरावे लागते. आपल्या न्याय हक्कासाठी आपल्याला आंदोलन करावेच लागते. जेन्झीने हे दाखवून दिले आहे. तुम्ही आंदोलन करा, आम्ही तुमच्या सोबत आहोत, असा विश्वास आदित्य ठाकरे यांनी दिला. त्यानंतर त्वरीत आयटीएन्सने आंदोलन जाहीर करीत ६ सप्टेंबर ही तारीखही घोषीत केली. तसेच, आदित्य ठाकरे यांनाही आंदोलनात सहभागी व्हावे, अशी विनंती केली. आदित्य ठाकरे यांनीही संमती दिली.

# स्वारगेट-कात्रज मेट्रोच्या भुयारी कामाला वेग!

## सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये दोन टीबीएम दाखल; मार्केट यार्ड स्थानकासाठी शाफ्टचे खोदकाम सुरू

**पुणे | प्रतिनिधी**

**पुण्यातील वाढती वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी महत्त्वाच्या ठरणाऱ्या स्वारगेट-कात्रज विस्तारित मेट्रो मार्गाच्या भुयारी कामाला आता वेग मिळणार आहे. या मार्गाच्या बोगदा खोदकामासाठी आवश्यक असलेल्या दोन अत्याधुनिक टनेल बोरिंग मशीन (टीबीएम) सप्टेंबर ते ऑक्टोबरदरम्यान पुण्यात दाखल होणार आहेत. त्यामुळे या मार्गाच्या प्रत्यक्ष भुयारी कामाला लवकरच सुरुवात होण्याची शक्यता आहे.**



स्वारगेट ते कात्रज हा मेट्रो मार्ग पूर्णपणे भुयारी असणार आहे. या मार्गावर बोगदे तयार करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार असून, संपूर्ण भुयारी मार्गाचे काम एकूण चार टीबीएमच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. पुण्यात दाखल होणाऱ्या टीबीएमची आवश्यक जोडणी आणि तांत्रिक प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर प्रत्यक्ष बोगदा खोदण्याच्या कामाला सुरुवात केली जाणार आहे.

दरम्यान, मेट्रो स्थानकांच्या उभारणीसाठी आवश्यक असलेल्या शाफ्ट खोदण्याच्या कामालाही सुरुवात झाली आहे. या अंतर्गत मार्केट यार्ड मेट्रो स्थानकासाठी शाफ्ट खोदण्याचे काम सोमवारपासून सुरू करण्यात आले आहे. स्थानकांच्या बांधकामासाठी तसेच भुयारी मार्गाच्या विविध टप्प्यांमध्ये या शाफ्टचा महत्त्वाचा उपयोग होणार आहे.

स्वारगेट-कात्रज मेट्रो मार्गामुळे शहरातील दक्षिण भागातील नागरिकांना मोठा फायदा होणार आहे. सध्या स्वारगेट, मार्केट यार्ड, कात्रज तसेच या परिसरातील प्रमुख रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असते. मेट्रो मार्ग उपलब्ध झाल्यानंतर या भागातील नागरिकांना सार्वजनिक वाहतुकीचा अधिक वेगवान आणि सोयीस्कर पर्याय मिळणार आहे.

टीबीएम पुण्यात दाखल झाल्यानंतर त्यांची उभारणी करून भुयारी खोदकामाला सुरुवात केली जाईल. त्याचबरोबर विविध स्थानकांच्या कामांनाही टप्प्याटप्प्याने गती दिली जाणार आहे. त्यामुळे आगामी काळात स्वारगेट-कात्रज मेट्रो मार्गाच्या कामाला आणखी वेग येण्याची अपेक्षा आहे.

या मार्गाचे भुयारी काम पूर्ण झाल्यानंतर पुणेकरांना स्वारगेटहून थेट कात्रजपर्यंत मेट्रोने प्रवास करता येणार आहे. त्यामुळे या मार्गावरील रस्ते वाहतुकीवरील ताण कमी होण्यास मदत होईल. तसेच प्रवाशांचा प्रवासाचा वेळ कमी होऊन सार्वजनिक वाहतुकीला चालना मिळण्याची शक्यता आहे.

स्वारगेट-कात्रज मेट्रो मार्ग हा पुण्याच्या वाहतूक व्यवस्थेसाठी महत्त्वाचा प्रकल्प मानला जात असून, टीबीएमच्या आगमनानंतर भुयारी कामाला मिळणारी गती या प्रकल्पाच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

> “स्वारगेट ते कात्रज मेट्रोमार्गाच्या भुयारीकरणासाठी लागणाऱ्या दोन मशीन सप्टेंबर ते ऑक्टोबरदरम्यान पुण्यात दाखल होत आहेत. उर्वरित दोन मशीन पुढील वर्षात दाखल होतील. भुयारी मार्गाच्या खोदकामासाठी एकूण चार टीबीएम लागणार आहेत. त्यापैकी दोन सप्टेंबर ते ऑक्टोबरदरम्यान पुण्यात दाखल होत आहेत. या मशीन आल्यानंतर आवश्यक ती कार्यवाही पूर्ण झाल्यावर खोदकामाची प्रत्यक्ष प्रक्रिया सुरू केली जाईल.”
>
> -चंद्रशेखर तांबवेकर, **अतिरिक्त महाव्यवस्थापक, महामेट्रो**

# पुणे रिंगरोडच्या विस्ताराला मंजुरी; १०,५०२ कोटींचा प्रकल्प मार्गी

**पुणे | प्रतिनिधी**

**शहरातील वाढती वाहतूक कोंडी कमी करण्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या पुणे रिंगरोडच्या पूर्व विस्तारिकरणाला राज्य सरकारकडून मंजुरी देण्यात आली आहे. सुमारे १० हजार ५०२ कोटी रुपयांच्या सुधारित प्रकल्प खर्चास मंजुरी मिळाल्याने या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या पुढील कामांना वेग येणार आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत (एमएसआरडीसी) हा प्रकल्प राबविण्यात येत असून, पुणे शहराबाहेरील वाहतूक वळवून शहरातील वाहतूक कोंडी कमी करणे हा या रिंगरोडचा प्रमुख उद्देश आहे.**



पुणे-सोलापूर रस्त्यावरील सोरतापवाडी (वळती) ते पुणे-सातारा रस्त्यावरील वरवे (बु.) (शिरवे) या दरम्यानचा सुमारे ३९.६०५ किलोमीटर लांबीचा प्रवेश नियंत्रित द्रुतगती मार्ग या प्रकल्पाच्या पूर्व विस्तारिकरणात समाविष्ट करण्यात आला आहे. त्यामुळे पुणे शहराच्या पूर्व आणि दक्षिण भागातील वाहतूक व्यवस्थेला मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.

पुणे शहरातून जाणाऱ्या आंतरराज्य तसेच राज्यांतर्गत वाहतुकीचा मोठा भार सध्या शहरातील प्रमुख रस्त्यांवर पडत आहे. या वाहतुकीला शहराबाहेरून पर्यायी मार्ग उपलब्ध करून देऊन शहरातील वाहतूक कोंडी कमी करणे हा रिंगरोडचा मुख्य उद्देश आहे. रिंगरोडमुळे पुणे शहरातून एका भागातून दुसऱ्या भागात जाणाऱ्या वाहनांना शहराच्या मध्यवर्ती भागातून जाण्याची आवश्यकता कमी होणार आहे. परिणामी शहरातील प्रमुख चौक, महामार्ग आणि अंतर्गत रस्त्यांवरील वाहनांची गर्दी कमी होण्यास मदत होईल. पुणे तसेच पिंपरी-चिंचवड परिसरातील वाढत्या नागरीकरणाच्या पार्श्वभूमीवर हा प्रकल्प महत्त्वाचा ठरणार आहे.

रिंगरोडच्या संबंधित प्रकल्पाची लांबी सुमारे २५.०३ किलोमीटर असून, २०३१ मध्ये दररोज सुमारे ४.४९ लाख प्रवासी या मार्गावरून प्रवास करतील, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. वाढती लोकसंख्या, वाहनांची संख्या आणि पुणे महानगर प्रदेशातील झपाट्याने होणारा औद्योगिक व निवासी विकास लक्षात घेता भविष्यात या मार्गाची वाहतूक क्षमता अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. या रिंगरोडच्या माध्यमातून शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासोबतच पुणे शहराशी जोडलेल्या विविध महामार्गांवरील वाहतूक अधिक सुरळीत करण्याचे नियोजन आहे.

या मार्गाची रचना प्रवेश नियंत्रित द्रुतगती मार्गाच्या धर्तीवर करण्यात येणार असून, १२० किलोमीटर प्रतितास वेगमर्यादेच्या अनुषंगाने मार्ग विकसित करण्याचे नियोजन आहे. वाहतूक सुरक्षेला प्राधान्य देताना आधुनिक अभियांत्रिकी तंत्रज्ञान आणि आवश्यक सुरक्षा सुविधा उभारल्या जाणार आहेत. प्रकल्पात दोन इंटरचेंज, तीन मोठे पूल, पाच लहान पूल, १८ उन्नत मार्गिका किंवा उड्डाणपूल आणि चार बोगद्यांचा समावेश आहे. त्यामुळे विविध ठिकाणी स्थानिक वाहतूक आणि रिंगरोडवरील वेगवान वाहतूक यांच्यातील संघर्ष कमी होण्यास मदत होणार आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना वृक्षारोपण तसेच इंटरचेंजजवळ लँडस्केपिंग करण्याचेही नियोजन आहे. त्यामुळे हा मार्ग केवळ वाहतूक सुविधा म्हणून नव्हे, तर आधुनिक आणि पर्यावरणपूरक पायाभूत सुविधा म्हणून विकसित करण्याचा प्रयत्न आहे.

### १६८.८८१ किलोमीटरची सलग रिंगरोड

पुणे रिंगरोडची एकूण लांबी १६८.८८१ किलोमीटर असून, प्रकल्पाची सलगता सुनिश्चित झाल्यानंतर एकात्मिक प्रवेश नियंत्रित मार्गिका पूर्ण होणार आहे. या संपूर्ण प्रकल्पासाठी सुमारे ८० टक्के भूसंपादन पूर्ण झाले असून, प्रकल्पाचे काम निर्धारित वेळेत पूर्ण करण्याच्या दृष्टीने नियोजन करण्यात आले आहे. प्रकल्पाचा मोठा भाग पूर्णत्वाच्या दिशेने गेल्यानंतर पुणे शहरातील तसेच पुणे महानगर प्रदेशातील वाहतुकीच्या स्वरूपात मोठा बदल होण्याची अपेक्षा आहे.

### दोन टप्प्यांत कामाला गती

रिंगरोड प्रकल्पासाठी भूसंपादन पूर्ण झाल्यानंतर कामाच्या विविध टप्प्यांना गती देण्यात येणार आहे. प्रकल्प २०२९ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन असल्याचे सांगण्यात आले आहे. त्यानुसार आवश्यक त्या प्रशासकीय, तांत्रिक आणि भूसंपादनाशी संबंधित बाबी पूर्ण करण्यावर भर दिला जाणार आहे. रिंगरोडमुळे पुणे शहरातील वाहतूक केवळ एका दिशेने वळविण्याऐवजी शहराभोवती पर्यायी वाहतूक व्यवस्था निर्माण होणार आहे. त्यामुळे पुण्यात प्रवेश करणाऱ्या तसेच पुण्यातून बाहेर जाणाऱ्या वाहनांसाठी जलद आणि अधिक सुरक्षित पर्याय उपलब्ध होईल.

# PMRDA हद्दीतील रस्ते आणि विकासकामांना गती

## खासदार डॉ. अमोल कोल्हे यांचा पीएमआरडीए मुख्यालयात आढावा

**पुणे | प्रतिनिधी**

**शिरूर लोकसभा मतदारसंघातील पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) हद्दीत येणाऱ्या भागातील रस्ते आणि विविध विकासकामांना गती देण्यासाठी खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी आकुर्डी येथील पीएमआरडीए मुख्यालयाला भेट देत कामांचा सविस्तर आढावा घेतला.**



महानगर आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी पीएमआरडीएच्या वतीने सुरू असलेल्या विविध विकासकामांची सादरीकरणाद्वारे सविस्तर माहिती दिली. यावेळी शिरूर लोकसभा मतदारसंघातील पीएमआरडीए हद्दीत येणाऱ्या भागांमधील रस्त्यांची सद्य:स्थिती, सुरू असलेली कामे, प्रस्तावित प्रकल्प तसेच उपलब्ध निधी याबाबत सविस्तर आणि मुद्देसूद चर्चा करण्यात आली. संबंधित कामांची प्रगती, प्रलंबित बाबी आणि आगामी काळात हाती घेण्यात येणाऱ्या विकासकामांचा यावेळी आढावा घेण्यात आला.

नागरिकांना दैनंदिन जीवनात भेडसावणाऱ्या समस्या तातडीने सोडविण्यास प्राधान्य द्यावे, अशी स्पष्ट सूचना खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी अधिकाऱ्यांना केली. नागरिकांच्या मूलभूत गरजा आणि स्थानिक पातळीवरील अडचणी दूर करण्यासाठी प्रशासनाने अधिक संवेदनशीलपणे आणि तत्परतेने काम करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. केवळ प्रस्ताव तयार करणे किंवा कागदोपत्री प्रक्रिया पूर्ण करणे पुरेसे नसून, संबंधित कामे प्रत्यक्षात सुरू होऊन ती वेळेत पूर्ण होणे आणि त्याचा थेट फायदा नागरिकांना मिळणे आवश्यक आहे, असे त्यांनी अधोरेखित केले.

पीएमआरडीएकडून या संदर्भात सकारात्मक प्रतिसाद मिळाला असून, बैठकीत निश्चित करण्यात आलेल्या कामांचा नियमितपणे आढावा घेणार असल्याचे डॉ. कोल्हे यांनी सांगितले. विकासकामांच्या अंमलबजावणीमध्ये कोणत्याही प्रकारची दिरंगाई होऊ नये, यासाठी संबंधित अधिकाऱ्यांशी सातत्याने संपर्क ठेवून कामांच्या प्रगतीचा आढावा घेतला जाणार आहे. मतदारसंघातील प्रत्येक प्रलंबित विकासकाम मार्गी लागेपर्यंत संबंधित विभागांकडे सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवण्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.

नागरिकांच्या दैनंदिन अडचणींना प्राधान्य देत रस्ते, पायाभूत सुविधा आणि प्रस्तावित विकासकामे वेळेत पूर्ण करण्यासाठी प्रशासनाशी समन्वय साधण्यावर या बैठकीत विशेष भर देण्यात आला. पीएमआरडीए हद्दीतील विविध भागांमध्ये आवश्यक असलेल्या विकासकामांना गती देऊन नागरिकांना अधिक चांगल्या पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने प्रशासनाने ठोस पावले उचलावीत, अशी अपेक्षाही यावेळी व्यक्त करण्यात आली.

> "शिरूर लोकसभा मतदारसंघातील पीएमआरडीए हद्दीत येणाऱ्या भागातील रस्ते आणि विविध विकासकामांना गती मिळणे आवश्यक आहे. नागरिकांना रोज भेडसावणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्याला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, अशी अधिकाऱ्यांना सूचना केली आहे. सुरू असलेली कामे, प्रस्तावित प्रकल्प आणि निधीच्या उपलब्धतेचा सविस्तर आढावा घेतला आहे. पीएमआरडीएकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला असून, निश्चित झालेल्या कामांचा नियमित आढावा घेत राहणार आहे. मतदारसंघातील प्रत्येक प्रलंबित प्रश्न मार्गी लागेपर्यंत सातत्याने पाठपुरावा सुरूच राहील."
>
> – डॉ. अमोल कोल्हे, **खासदार, शिरूर लोकसभा मतदारसंघ**

# पुण्यातील सार्वजनिक स्वच्छतागृहांची दुरवस्था; महिलांची सुरक्षा 'रामभरोसे'

**पुणे | प्रतिनिधी**

**शहरातील सार्वजनिक स्वच्छतागृहांची दुरवस्था कायम असतानाच महिलांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न ऐरणीवर आला आहे. पुणे महापालिका हद्दीतील अनेक सार्वजनिक स्वच्छतागृहांमध्ये महिला सुरक्षारक्षक नसल्याचे तसेच कार्यरत सीसीटीव्ही यंत्रणाही उपलब्ध नसल्याचे महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे. काही भागांतील स्वच्छतागृहे बंद असून, काही स्वच्छतागृहांची अवस्था मोडकळीस आलेली आहे. त्यामुळे सार्वजनिक ठिकाणी स्वच्छतागृहांचा वापर करणाऱ्या महिलांच्या सुरक्षिततेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.**




### सुविधा कागदावरच राहणार का?

शहरातील महिलांसाठी सार्वजनिक स्वच्छतागृहांची सुविधा उपलब्ध करून देताना केवळ नवीन स्वच्छतागृहे उभारणे पुरेसे नसून, त्यांची स्वच्छता, नियमित देखभाल आणि सुरक्षितता यांनाही समान महत्त्व देणे आवश्यक आहे. सध्या अनेक ठिकाणी महिला सुरक्षारक्षकांचा अभाव, सीसीटीव्ही यंत्रणा कार्यरत नसणे, स्वच्छतागृहे बंद असणे आणि काही ठिकाणी मोडकळीस आलेली अवस्था यामुळे सुविधांच्या गुणवत्तेवर प्रश्न उपस्थित होत आहेत.

दुसरीकडे, शहरात १०० अत्याधुनिक प्री-फॅब्रिकेटेड स्वच्छतागृहे उभारण्यासाठी ४० कोटी ६० लाख रुपयांचा प्रस्ताव मंजुरीच्या प्रतीक्षेत आहे. त्यामुळे एकीकडे विद्यमान स्वच्छतागृहांची दुरवस्था आणि सुरक्षेचा अभाव असताना दुसरीकडे नवीन स्वच्छतागृहांच्या प्रस्तावाला मंजुरी मिळण्याची प्रतीक्षा असल्याचे चित्र आहे.

नगरसेविका ऐश्वर्या थोरात यांनी पुणे शहरातील सार्वजनिक स्वच्छतागृहांची संख्या, त्यांची सद्य:स्थिती तसेच महिलांच्या सुरक्षेसाठी महापालिकेकडून करण्यात आलेल्या उपाययोजनांबाबत प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नाला घनकचरा व्यवस्थापन विभागाने दिलेल्या उत्तरातून शहरातील सार्वजनिक स्वच्छतागृहांची सद्यस्थिती आणि महिलांच्या सुरक्षेतील त्रुटी समोर आल्या आहेत.

महापालिकेच्या विविध क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्दीतील स्वच्छतागृहांची स्थिती पाहता अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात स्वच्छतागृहे बंद असल्याचे समोर आले आहे. सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतील ५० स्वच्छतागृहांपैकी तब्बल २५ स्वच्छतागृहे बंद आहेत. त्यामुळे या परिसरातील उपलब्ध स्वच्छतागृहांवर मोठा ताण येण्याची शक्यता आहे.

वडगाव शेरी भागातील ५५ स्वच्छतागृहांपैकी १४ स्वच्छतागृहे बंद आहेत. घोले पाटील क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत १३४ पैकी चार स्वच्छतागृहे बंद असून, पाच स्वच्छतागृहे मोडकळीस आलेली आहेत.

नगर रोड-वाघोली भागात १११ स्वच्छतागृहे असून, त्यापैकी एक स्वच्छतागृह मोडकळीस आले असल्याचे प्रशासनाच्या उत्तरातून स्पष्ट झाले आहे. त्यामुळे शहरातील विविध भागांमध्ये सार्वजनिक स्वच्छतागृहांच्या देखभाल-दुरुस्तीचा प्रश्न अद्याप कायम असल्याचे दिसून येत आहे. शहरातील घोले पाटील, येरवडा-वडगाव शेरी, नगर रोड-वाघोली, औंध-बाणेर, सिंहगड रोड, हडपसर-मांजरी, वानवडी, विश्रामबागवाडा आणि कसबा पेठ या भागांतील स्वच्छतागृहांमध्ये महिला सुरक्षारक्षक किंवा कार्यरत सीसीटीव्ही यंत्रणा नसल्याचे महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

सार्वजनिक स्वच्छतागृहांमध्ये महिलांसाठी स्वतंत्र आणि सुरक्षित व्यवस्था असणे आवश्यक असताना अनेक ठिकाणी सुरक्षारक्षक तसेच सीसीटीव्हीची सुविधा उपलब्ध नसल्याने सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी या स्वच्छतागृहांचा वापर करणाऱ्या महिलांच्या सुरक्षिततेसाठी ठोस उपाययोजना आवश्यक असल्याचे चित्र आहे.

सार्वजनिक स्वच्छतागृहांच्या देखभालीबाबत क्षेत्रीय कार्यालयांकडून देण्यात आलेल्या उत्तरांमध्येही विसंगती आढळून आली आहे. काही ठिकाणी स्वच्छतागृहांची योग्य देखभाल न करणाऱ्या कंत्राटदारांवर दंडात्मक कारवाई झालेली नसल्याचे सांगण्यात आले आहे. तर काही ठिकाणी स्वच्छतागृहांच्या देखभालीसाठी कंत्राटदारच नसल्याचे प्रशासनाच्या उत्तरातून समोर आले आहे.

त्यामुळे स्वच्छतागृहांची स्वच्छता, देखभाल, दुरुस्ती आणि सुरक्षेची जबाबदारी निश्चित करून त्याची नियमित तपासणी करण्याची गरज निर्माण झाली आहे. बंद किंवा मोडकळीस आलेली स्वच्छतागृहे तातडीने दुरुस्त करून नागरिकांसाठी खुली करण्याची आवश्यकता आहे.

एकीकडे १०० अत्याधुनिक स्वच्छतागृहांसाठी ४०.६० कोटी रुपयांचा प्रस्ताव मंजुरीच्या प्रतीक्षेत आहे, तर दुसरीकडे विद्यमान स्वच्छतागृहांच्या सुरक्षेचा आणि देखभालीचा प्रश्न कायम आहे. त्यामुळे नवीन प्रकल्पांसोबतच सध्याच्या स्वच्छतागृहांची दुरुस्ती, नियमित देखभाल आणि महिलांच्या सुरक्षेसाठी ठोस उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.